आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी ६.००)
बुधवार, दिनांक : ०८ मे, २०२४

ठळक बातम्या

•लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याच्या मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक, प्रचार शिगेला.

•मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता १० जून रोजी मतदान होणार

•हिंसाचारग्रस्त मणिपूरमधील विदयार्थ्यांनी शिक्षण अखंडित सुरू ठेवण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंचा केला सत्कार.

•विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमान, नागपुरातही आज आणि उद्या अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट.

#####

चौथा टप्पा + आजच्या सभा

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याच्या मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक सभा, बैठका, रोड शो, पदयात्रा आदींच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. चौथ्या टप्प्यात राज्यातल्या छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जालना इथं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सभा घेणार आहेत. शहरातल्या डॉ. फ्रेजर बॉय हायस्कूल मैदानात आता थोड्याच वेळात ही सभा सुरू होत आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज नाशिक दौऱ्यावर असून, त्यांच्या उपस्थितीत शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. त्यानंतर त्यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भगूर आणि नाशिक महापालिकेचे माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

शेतकऱ्यांच्या उत्पादित साखरेला निर्यात बंदी आहे, कांद्याला निर्यात बंदी केली जाते. गरीब शेतकऱ्यांची ही पिकं असून त्याला भाव न मिळणं, हे केंद्रातील मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज धुळे जिल्ह्यात शिरपूर इथं प्रचारसभा घेतली.

पदवीधर मतदारसंघ

भारत निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर केली आहे. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसंच मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांकरिता निवडणूक होत असून यासाठी सोमवार, १० जून २०२४ रोजी मतदान होणार आहे.

विलास विनायक पोतनीस (मुंबई पदवीधर मतदारसंघ), निरंजन वसंत डावखरे (कोकण पदवीधर मतदारसंघ) किशोर भिकाजी दराडे (नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ) आणि कपिल हरिश्चंद्र पाटील (मुंबई शिक्षक मतदारसंघ) हे दिनांक ७ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगानं २ शिक्षक मतदारसंघ आणि २ पदवीधर मतदारसंघाकरिता निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

या निवडणुकीसाठी बुधवार, दिनांक १५ मे २०२४ रोजी अधिसूचना जारी केली जाईल. या निवडणुकीकरिता बुधवार, दिनांक २२ मे पर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येईल. उमेदवारांनी दाखल केलेल्या अर्जांची छाननी शुक्रवार, दिनांक २४ मे रोजी केली जाईल, तर उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत सोमवार, दिनांक २७ मे अशी आहे. सोमवार, दिनांक १० जून २०२४ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत या चारही मतदारसंघाकरिता मतदान होईल. गुरूवार, दिनांक १३ जून रोजी मतमोजणी होईल. ही संपूर्ण प्रक्रिया दिनांक १८ जून २०२४ रोजी पूर्ण होईल, असं भारत निवडणूक आयोगानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविलं आहे.

## नाना पटोले

धुळे  आणि नंदुरबार दोन्ही लोकसभा मतदारसंघातील जनतेत भारतीय जनता पक्षाबद्दल प्रचंड रोष आहे. त्यामुळे यंदा धुळे, नंदूरबारमध्ये भाजपचा दारुण पराभव होईल, असा विश्वास कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज धुळयात वार्ताहर परिषदेत बोलतांना व्यक्त केला. आज सकाळी हॉटेल कृष्णाई इथं कॉंग्रेसच्या वतीनं पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी आ. कुणाल पाटील, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर उपस्थित होते. यावेळी बोलतांना नाना पटोले म्हणाले की, तिसऱ्या टप्प्याचं मतदान पार पडलं आहे. या टप्प्यात महाविकास आघाडी प्रचंड मतानं विजयी होणार आहे. दोन्ही मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमदेवार निवडून येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.
लोकनिर्णय महाराष्ट्राचा

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘दिंडोरी आणि नाशिक’ लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

## मणिपूर विद्यार्थी

खंडित झालेलं  शिक्षण पुन्हा सुरू ठेवण्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आशेचा किरण ठरलं असल्याच्या भावना मणिपूरच्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या. शैक्षणिक अडचणी लक्षात घेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठानं  वेळीच प्रवेश दिल्यानं  कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांचा मणिपूर इथल्या  विद्यार्थ्यांनी सत्कार करीत विशेष आभार मानले.

मणिपूर इथं अस्थिर परिस्थिती असताना  नागपूर विद्यापीठात  प्रवेश मिळावा म्हणून या विद्यार्थ्यांनी संपर्क साधला.  कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक अडचण लक्षात घेता तातडीनं मदत करीत या विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये करवून घेतले होते. वेळीच मदत केल्यानं अशांत असलेल्या मणिपूर येथील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात त्यांचं शिक्षण सुरू ठेवता आलं.

## डॉ. हेडगेवार रक्त पेढी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोककल्याण समितीच्या वतीनं राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाअंतर्गत डॉ. हेडगेवार रक्तपेढीत उद्यापासून इरॅडीएशन सुविधा सुरू होणार असून अशी व्यवस्था असलेली ही मध्य भारतातील पहिलीच रक्तपेढी असल्याची माहिती रक्तपेढीचे सचिव अशोक पत्की यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. 31 वर्षापूर्वी 9 मे 1993 रोजी डॉ. हेडगेवार रक्तपेढीची सुरुवात झाली होती. उद्या या संस्थेचा 32 वा वर्धापन दिन असून त्याचवेळी या नव्या सुविधेचं उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांच्या  हस्ते होणार असून यावेळी प्रमुख अतिथी म्हणून एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी आणि वेकोलीचे अध्यक्ष जयप्रकाश त्रिवेदी उपस्थित राहणार आहेत.

## 'एक डाव भटाचा'

अत्यंत लोकप्रिय विनोदी नाटक 'एक डाव भटाचा' चे एकाच दिवशी सलग चार प्रयोग करून राज कला मंदिरचे कलाकार शनिवार, दि. 11 मे 2024 रोजी एक आगळा-वेगळा विक्रम प्रस्थापित करणार आहेत. साई सभागृह, वोक्हार्टच्या मागं, शंकरनगर येथे सकाळी 9 वाजता या विक्रमाला प्रारंभ होणार असून सायंकाळी 6 वाजता चौथा प्रयोग केला जाईल. या उपक्रमाचं उद्घाटन सकाळी 9 वाजता झाडीपट्टी कलावंत पद्मश्री परशुराम खुणे आणि नाट्यकर्मी रघुवीर जोशी यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर नाटकाला प्रारंभ होईल. हा प्रयोग विशेषत्वानं ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवण्यात आला आहे. नाटकाचा दुसरा प्रयोग 12 वाजता होणार असून खास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असेल, तर तिसरा प्रयोग दुपारी 3 वाजता नाट्य कलावंतांसाठी आयोजित करण्यात आला आहे. या प्रयोगाला ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, संजय भाकरे, संजय वलीवकर आणि सलीम शेख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. चौथा आणि समारोपाचा प्रयोग सायंकाळी 6 वाजता होणार असून हा प्रयोग आमंत्रितांसाठी राखीव राहणार आहे. संस्कार भारतीच्या अध्यक्ष कांचन गडकरी यांची या प्रयोगाला विशेष उपस्थिती राहील.

‘नाम गुम जायेगा’

स्वरांकित संगीत संस्थेतर्फे सुप्रसिद्ध गीतकार, तसेच बहुमुखी प्रतिभेचे धनी गुलजार यांच्या लेखणीतून साकारलेल्या सुमधुर गीतांचा ‘नाम गुम जायेगा’ हा कार्यक्रम शुक्रवार, दि. 10 मे रोजी आयोजित करण्यात आला आहे.

लक्ष्मीनगर स्थित सायंटिफिक सभागृहात संध्याकाळी 6 वाजता होणाऱ्या या संगीतमय कार्यक्रमाची संकल्पना अनुजा सावजी यांची आहे.

बस प्रवासी मृत्यू

गोंदिया-तुमसर- भंडारा या बसमध्ये देव्हाडी इथून एक प्रवासी बसमध्ये चढला. तुमसर शहराच्या वेशीवर त्याला भोवळ आली. तो प्रवासी बेशुद्ध पडल्यावर त्याच्या दोन साथीदारांनी बस रुग्णालयात नेण्याची विनंती बसवाहकाला केली. परंतु त्यानं बस सरळ बसस्थानकात नेली. त्यानंतर सहकाऱ्यांनी रुग्णालयात नेलं असता डॉक्टरांनी तपासून त्या प्रवाशास मृत घोषित केलं.

ही बस भंडारा आगाराची आहे. घडलेल्या घटनेबाबत भंडारा आगाराच्या व्यवस्थापकांना संपूर्ण माहिती दिली असून योग्य कारवाई केली जाणार असल्याचं तुमसर आगार व्यवस्थापकांनी सांगितलं.

गट शेती

गट शेतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आंबा फळबागेची लागवड केल्यास बाजारपेठ, तांत्रिक साहाय्य, निर्यात आदी सहज उपलब्ध होईल. वर्धा जिल्ह्यातील हवामान आंबा पिकाच्या फळबागेसाठी अनुकूल असून, योग्य नियोजन केल्यास शेतकऱ्यांना मोठा नफा मिळवता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी आंबा फळबाग शेतीकडं वळावं, असं आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. वर्धा इथल्या एक दिवसीय आंबा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते.

## नामांतर

मुंबई उच्च न्यायालयानं औरंगाबादचं नामांतर छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचं नामांतर धाराशिव करण्याच्या केंद्र आणि राज्य सरकारच्या निर्णयाला या जिल्ह्यातील काही नागरिकांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. आज या प्रकरणाचा निकाल जाहीर करण्यात आला असून यासंबंधी दाखल करण्यात आलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. यावर प्रतिक्रिया देताना आज बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न खऱ्या अर्थानं पूर्ण झालं. संभाजीनगर हे नाव सर्वप्रथम बाळासाहेब ठाकरे यांनी दिलं होतं;

## हवामान

गेल्या 24 तासात विदर्भात नागपूर, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं काल हजेरी लावली. त्यामुळं या जिल्ह्यांमध्ये कमाल तापमानात किंचित घट झाली आहे. दरम्यान उर्वरित जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 35 अंश सेल्सिअस ते 43 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान ४३ पूर्णांक सात दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ वाशिम इथं 43 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस, तर वर्धा इथं 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

आज आणि उद्या विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. नागपूर, वर्धा, अमरावती यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

गोंदिया जिल्ह्यामध्ये काल आलेल्या अवकाळी पावसाचा धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसला असून शेतामध्ये उभं असलेलं आणि कापून झालेलं धानपीक यांचं प्रचंड नुकसान झालं आहे, तर मळणी केलेलं धान देखील कालच्या पावसानं ओलं झाल्यानं त्याला वाळविण्यासाठी शेतकरी धडपड करत आहेत. या पावसामुळं शेतकऱ्यांच्या तोंडचा आलेला घास हिरावला गेल्यानं शासनाकडून नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

#######